मानव्यविद्याशाखेअंतर्गत राज्यशास्त्र विषयात पि.एच.डी. पदवीसाठी सादर करावयाचा पूर्व संशोधन आराखडा प्रबंध

महाराष्ट्रातील आदिवासी समुदायांच्या शिक्षणा संदर्भातील प्रशासकीय धोरणांचे व कार्याचे बहुआयामी विश्लेषण

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

विषय : राज्यशास्त्र

संशोधक

चंद्रशेखर पंढरीनाथ जाधव

मार्गदर्शक

डॉ. किरण व्यंकटराव आयनेनीवार

राज्यशास्त्र विभाग, सरस्वती कला महाविद्यालय,

किनवट, जि. नांदेड

संशोधन केंद्र

पिपल्स कॉलेज, नांदेड

शैक्षणिक वर्ष २०२४

अ.क्र	शिर्षक	पृ.क्र.
१	प्रस्तावना	१
२	संशोधनाची तर्कसंगतता	८
३	विषय निवडीची कारणे	९
४	पूर्व संशोधनाची पाहणी	१०
५	संशोधनाची उद्‌दिष्टे	१३
६	संशोधन विषयाची गृहितके	१३
७	संशोधनाची अभ्यासपद्धती	१४
८	तथ्स संकलन	१५
९	संशोधनाची चले	१६
१०	नमुना निवड पद्धत	१७
११	संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा	१८
१२	नियोजित संशोधन प्रकरणे	१९
१३	संदर्भ सूची	

शिर्षक : महाराष्ट्रातील आदिवासी समुदायांच्या शिक्षणा संदर्भातील प्रशासकिय धोरणांचे व कार्याचे बहुआयामी विश्लेषण

१)प्रस्तावना

शिक्षण म्हणजे खऱ्या अर्थाने सत्याचा शोध घेणे होय. ज्ञान आणि प्रबोधनाच्या माध्यमातून जाणारा हा एक अनंत प्रवास आहे. हा प्रवास माणसाला विकासाचे दर्शन घडवतो. इथे शुद्रता, मत्सर, विसंगती किंवा शत्रुत्वाला वाव नसतो. शिक्षणामुळे मानवाचे एका परिपूर्ण आणि उदात्त आत्म्यात रुपांतर होते. शिक्षणाने मानवाचा आत्मसन्मान वाढतो. जर मानवी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात शिक्षणाच्या खऱ्या अर्थाचा अवलंब केला तर जग फार सुंदर दिसेल.

डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम

मा. राष्ट्रपती

प्रगती आणि विकासाचा पाया म्हणून शिक्षणाकडे पाहिले जाते. सामाजिक आणि आर्थिक परिवर्तन घडवून आणण्याचे कार्य शिक्षण करते. भारतामध्ये आपली सांस्कृतिक विविधता, भौगोलिक विषमता, प्रचंड आकार लक्षात घेता दर्जेदार शिक्षणाचा समान पातळीतून सर्वदूर प्रसार करणे हे एक मोठे आव्हान आहे. शैक्षणिक सक्षमीकरणासाठी प्रयत्न करणाऱ्या अनेक उपेक्षित समुदायांपैकी एक समुदाय म्हणजे आदिवासी समुदाय होय. जो एक सामाजिक—सांस्कृतिक ओळख असलेला व विशिष्ट गरजा असलेला एक महत्वपूर्ण घटक आहे.

महाराष्ट्र राज्यामध्ये असे अनेक समुदाय वास्तव्य करतात. जे अतिशय दुर्गम भागात राहतात. या समुदायांची शैक्षणिक विकासापासून वंचितता दूर करण्यासाठी भारत सरकार तसेच महाराष्ट्र सरकार अथक प्रयत्न करण्यात आघाडीवर आहे. या संशोधनकार्यात **महाराष्ट्रातील आदिवासी शिक्षणा संबंधीत धोरणांचा काटेकोरपणे शोध** घेण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. आदिवासी समुदायांना भेडसावणाऱ्या विविध शैक्षणिक समस्यांचा आठावा घेतला जाणार आहे.

महाराष्ट्रातील आदिवासी जमाती बद्दल थोडक्यात माहिती :

घटनेतील कलम ३४२ (१) नुसार राष्ट्रपतींनी घोषीत केलेल्या जमातींना 'अनुसुचित जमाती' असे म्हणतात.

एकाकी जंगलात डोंगरात राहणारे व ज्यांना आधुनिक संस्कृती व जीवनाचा परिचय होऊ शकला नाही अशा लोकांना गिरीजन किंवा आदिवासी असे म्हणतात.

अनुसुचित जमातींची लोकसंख्या:

२०११ च्या जनगणनेनुसार भारतात अनुसूचीत जमातीची लोकसंख्या १० कोटी ४२ लाख आहे.जी भारताच्या एकूण लोकसंख्येच्या ८.६ टक्के एवढी आहे. भारतात अनुसुचित जमातीच्या लोकसंख्येनुसार महाराष्ट्राचा दुसरा क्रमांक लागतो.

महाराष्ट्रात सुमारे ४७ अनुसूचित जमाती आहेत. ज्यात कातकरी, कोलम, माडिया, गोंड या अतिमागास जमाती आहेत.

आदिवासींचे वास्तव्य :

१.सह्याद्री पर्वतमय प्रदेश
२.सातपुडा पर्वतमय प्रदेश
३.गोंडवाना प्रदेशातील मराठवाडा आणि विदर्भ

आदिवासी शिक्षणाच्या ऐतिहासिक प्रगतीचा आढावा :

स्वातंत्र्यापूर्वी महाराष्ट्रातील आदिवासी समुदाय देशातील इतर आदिवासी समुदायाप्रमाणे दुर्लक्षित आणि असंघटित होते. ख्रिस्तियन मशिनरींनी आदिवासी बहुल भागात काही प्रमाणात शिक्षणाचा प्रसार केला. परंतू तो नगण्य होता

स्वातंत्र्यानंतर आदिवासी शिक्षणाकडे सरकारने विशेष लक्ष दिले. त्यासंदर्भात काही घडामोडींचा घेतलला आढावा
मध्यंतरीतील टप्पे
कोठारी आयोग १९६४
राष्ट्रिय शैक्षणिक धोरण १९६६
राष्ट्रिय शैक्षणिक धोरण १९८६
आर.टी.ई. कायदा २००९
राष्ट्रिय ज्ञान आयोग २००५
सुब्रमण्यम समिती २०१५

राष्ट्रिय शैक्षणिक धोरण २०२०

या दरम्यान केंद्राद्वारे तसेच राज्य सरकारद्वारे आश्रम शाळा, एकलव्य मॉडेल स्कूल, वसतीगृहे, कनिष्ठ तसेच वरिष्ठ महाविद्यालयांची निर्मिती करुर पायाभूत सुविधांची निर्मिती करण्यात आली.

हया सर्व घडामोडी भारतीय शिक्षणाच्या वाटचालीतील प्रगतीचे निर्देशक मानल्या जातात. तसेच या धोरणांमध्ये संपूर्ण भारतातातील आदिवासी शिक्षणासाठी विशेष भर देऊन अनेक तरतुदी करण्यात आल्या. जसे की...

- आदिवासी उप योजना: Tribal Sub Plan

  या योजनेद्वारे आदिवासी समाजाच्या सर्वांगिण विकास घडवून आणण्याचा प्रयत्न केला गेला.तसेच आदिवासी समाजजीवन उंचावण्याचा प्रयत्न केला गेला.

  एकात्मिक आदिवासी विकास कार्यक्रम :

  आदिवासी समुदाय आणि समाजातील इतर समुदाय यांच्यातील विकासाचे अंतर कमी करण्यासाठी या योजनेअंतर्गत विशेष अनुदाने देण्यात आली, जी फक्त आदिवासी विकासाकरीता करण्यात आली.

- सुधारित क्षेत्र विकास दृष्टिकोन : MADA & Mini MADA
- ITDP – Integrated Tribal Development program.

- **विशिष्ट केंद्रिय सहाय्य** :

राज्यघटनेतील कलम २७५ १ द्वारे केंद्रद्वारे राज्यांना देणाया मदतीचा येथे उल्लेख आहे. यामध्ये केंद्राच्या संबंधीत वर्षात देण्यात आलेल्या एकूण मदतीपैकी ४० ते ५० टक्के मदत ही फक्त आदिवासींच्या शिक्षणासाठी खर्च होईल अशी तरतुद आहे.

आदिवासी समुदायांच्या शैक्षणिक समस्या:

भौगोलिक विलगता : दुर्गम भागात वास्तव्य असल्याने शैक्षणिक पायाभूत सुविधांची निर्मिती करणे तसेच त्याची देखभाल करणे आव्हानात्मक बनते.

भाषिक आढथळा: आदिवासी समुदायांमधील भाषिक विविधतेमुळे अभ्यासक्रम ठरवताना व प्रभावी शिक्षणाची पूतर्ता करताना अडचणी येतात.

अपुरा निधी : धोरणांच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक निधी पुरवला जात नाही. त्यामुळे काही धोरणे कागदोपत्रीच राहतात.

पात्र शिक्षकांची कमतरता.

विद्यार्थ्यांचा उच्च गळती दर:

व्यावसायिक व तांत्रिक शिक्षणाचा अभाव:

२)संशोधनाची तर्कसंगतता :

भारत सरकारकडून तसेच महाराष्ट्र सरकार कडून आदिवासी समुदायांमध्ये शिक्षणाचे प्रमाण वाढण्यासाठी बरेच प्रयत्न झाले असले तरी या धोरणांच्या परिणामकारतेवर गंभीर

प्रश्न कायम आहेत. या समाजाला शिक्षणाच्या समान संधी मिळण्यासाठी ही धोरणे यशस्वी होतात को ? व या शैक्षणिक धोरणांचा आदिवासी व्यक्ती व समाज जीवनावर कोणकोणते सामाजिक व आर्थिक परिणाम होतात?

३)विषय निवडीची कारणे:

१ शैक्षणिक विषमता: आदिवासी समाज हा सुरुवातीपासून शिक्षणापासून दूर होता. या कारणाने विकासाच्या मुख्य प्रवाहात सामील होण्यास अडचणी निर्माण झाल्या. त्यामुळे आदिवासी समाज आथिक व सामाजिक दृष्टया मागास राहिला. या संशोधानाद्वारे या विषमतेवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला जाणार आहे

२ वंचित घटकांचे सबलीकरण करणे : शिक्षण हे सबलीकरणाचे सर्वात मुख्य माध्यम आहे. शिक्षणामुळे आदिवासी समाजाच्या प्रगतीच्या गतीमध्ये वाढ होईल.

संबंधित संशोधन हे खालील गोष्टींचा पाठपूरावा करेल :

१. आदिवासी समाजाला शिक्षणाच्या चांगल्या संधी उपलब्ध आहेत का ?

२. त्यांना मिळत असलेल्या शैक्षणिक सुविधांच्या दर्जा पडताळून पाहणे.

३.आदिवासी समाजाला त्याच्या परंपरेनुसार तसेच विविध पारंपारिक पद्धतीनुसार शिक्षण मिळते का ?

४. धोरणाचे मुल्यमापन:

केंद्र सरकार तसेच राज्य सरकारांकडून केलेल्या शैक्षणिक धोरणांचा अभ्यास करणे

५. शिक्षणाच्या मार्गदर्शक तत्वांचा अभ्यास करणे

६.शिक्षकांच्या प्रशिक्षणाचा पाठपुरावा करणे

७.सर्वसमावेशक शिक्षण व डिजिटल शिक्षण यांचा वापर दूरवर असलेल्या वंचित घटकांपर्यंत पोहचवणे.

८.शिक्षणाच्या प्रसाराच्या प्रयत्नांमध्ये सामाजिक सहभाग

वाढवणे.

९.शैक्षणिक वंचिततेच्या मुळ कारणांचा शोध घेउन आदिवासी समाजाचा सामाजिक आणि आर्थिक विकास घडवून आणणे.

इत्यादी कारणांसाठी या विषयात संशोधन करण्यात येणार आहे.

४)पूर्व संशोधनाची पाहणी :

संशोधन :

नाव : ठाणे जिल्ह्यातील आदिवासी शिक्षणाची सध्यस्थिती

संशोधक – चेतना पाटील (मुंबई विद्यापिठ)

संबंधित संशोधनाचे क्षेत्र ठाणे जिल्ह्यातल १० तालुक्यांपुरते मर्यादित होते. या क्षेत्रातील आदिवासी शिक्षणाविषयी सरकारकडुन घेण्याात आलेल्या प्रयत्नाचा पाठपुरावा करण्यात आला. यात प्राथमिक, माध्यमिक, तसेच उच्च माध्यमिक स्तरावरील शिक्षण व्यवस्थांच्या सद्यस्थितीचा आढावा घेण्यात आला.

यातुन काही निष्कर्षांची मांडणी करण्यात आली.

१) प्राथमिक शिक्षणांमध्ये लिंगभेद आढळून आला. तसेच शिक्षणाच्या संधी, शिक्षणाची गुणवत्ता यात फरक दिसून आला.

२) माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरांवर आढळून आलेल्या समस्या:

शिक्षणाच्या गळतील मध्ये वाढ.

३) राहत्या ठिकाणी शिक्षणाची उपलब्धतचा अभाव

४) पायाभूत सुविधांचा अभावाच्या कारणाने आश्रम शाळांची झालेली दुरावस्था

५)शैक्षणिक धोरणांच्या उद्दीष्टांकडे दुर्लक्ष

सुचविलेल्या उपाययोजना:

- आश्रम शाळांची मार्गदर्शक तत्वे ठरविताना आदिवासी समाजाच्या सांस्कृती व परंपरांचा विचार व्हावा.
- अति मागास व वंचित क्षेत्रात शिक्षण पुरवताना तेथील भौतिक साधनांच्या कमतरता लक्षात घेऊन त्यानुसार शिक्षणाच्या पद्धीतींमध्ये अनुकूल असे बदल करुन घ्यावे.
- शिक्षण घेणाऱ्या पहिल्या पिढीचे शिक्षणामध्ये तंत्रशिक्षण, मुल्यशिक्षण, व्यावसायिक शिक्षण, शरीरिक शिक्षण अशा विविधांगी शिक्षणाचा समावेश करावा.
- शासनाने शिक्षणासाठी खर्चाच्या मर्यादा वाढवाव्यात.

- शैक्षणिक धोरणे राबवण्याकरिता आावश्यक मनुष्यबळ वाढवावे.

महाराष्ट्रातील अनुसुचित जमातींचे शिक्षण : एन. एस. झांबरे

या पुस्तकात अनुसुचित जमातींच्या शैक्षणिक स्थितीचा सर्वांगिण/ सर्वसमावेशक आढावा मांडला आहे. आदिवासी जमातीच्या शैक्षणिक वाटचालीतील सर्व समस्याचा वर्णणात्मक अभ्यास करण्यात आला. तसेच सरकारच्या विविध धोरणांचाही आढावा या पुस्तकातून घेण्यात आला. या पुस्तकात खालील शैक्षणिक मुद्दयाविषयी चर्चा करण्यात आली आहे.

पायाभूत सुविधा

अभ्यासक्रम

शिक्षण प्रशिक्षण

राज्यातील आदिवासी जमातीच्या शिक्षणात झालेली प्रगती

भारतातील आदिवासी शिक्षण: महाराष्ट्रातील एक अनुभव — पि. बी. पाटील.

या पुस्तकात लेखकाने महाराष्ट्रातील अदिवासी शिक्षणाविषयीचा ऐतिहासिक आढावा घेऊन त्यासोबत सद्यस्थितीचे वर्णन केले आहे. तसेच यात आदिवासी जमातीच्या शैक्षणिक गरजा भागवण्यासाठी सरकाकडून तयार करण्याात आलेल्या विविध धोरणे व कार्यक्रमांवर प्रकाश टाकण्यात आला.तसेच आदिवासी जमातीच्या विशेष परंपरा व चालीरिती तसेच भाषिक विशेषतेवर भर टाकला गेला.

५)संशोधनाची उद्दिष्टे :

- महाराष्ट्रातील आदिवासी शैक्षणिक धोरणांच्या ऐतिहासिक उत्क्रांतीचे परिक्षण करणे आणि कालानुरुप झालेल्या महत्वाच्या घडामोडी व बदलांचा शोध घेणे.
- महाराष्ट्रातील आदिवासी समाजाला दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी सध्याच्या शासनाच्या धोरणांचे मूल्यमापन करणे. महाराष्ट्रातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कामगिरीवर आदिवासी धोरणांचा काय परिणाम होतो याचे विश्लेषण करणे.
- शैक्षणिक धोरणांचा लाभ घेण्यासाठी आदिवासी विद्यार्थ्यांना येणारे आव्हाने व अडथळे शोधणे. महाराष्ट्राच्या आदिवासी शिक्षणासाठी होणाऱ्या आर्थिक साधनसंपत्तीचे वाटप वापराचे मुल्यमापन करणे.
- महिला आदिवासी विद्यार्थ्यांच्या सशक्तीकरणामध्ये शैक्षणिक धोरणांचा वाटा अभ्यासने.
- शैक्षणिक धोरणाच्या यश—अपयशामध्ये इतर समुदायाच्या योगदानाची चौकशी करणे.
- आदिवासी शैक्षणिक धोरणांच्या सुधारणेसाठी पुराव्यानिशी शिफारसी देणे. तसेच गुणवत्तावर्धन व सांस्कृतिक सुसंगतता आणि प्रवेश वाढवण्यासाठी उपाययोजनात्मक शिफारसी देणे.

६) संशोधन विषयाची गृहितके:

१.महाराष्ट्रातील आदिवासी शिक्षणासाठी वाढीव निधीची तरतुद सुधारित शैक्षणिक परिणामाशी सकारात्मक संबंध साधणे.

२. महाराष्ट्रातील आदिवासी शिक्षण धोरणाबाबतच्या निर्णय प्रक्रियेत समुदायाचा सहभागामुळे धोरणात्मक परिणाम दिसून येताता. त्यांचा सस्कृतीचे व परंपरांचे संवर्धन होते.

३. डिजिटल शिक्षणाद्वारे व तंत्रज्ञानाच्या साधनाच्या वापराद्वारे आदिवासी विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाच्या संधी वाढवण्यात शैक्षणिक धोरण यशस्वी झाले आहे.

४.आदिवासी शिक्षणामध्ये जाणवणारा लिंगभेद विशिष्ट धोरणात्मक तरतुदी व सामाजिक घटकांद्वारे प्रभावित आहे.

५.महाराष्ट्रातील आदिवासी शैक्षणिक धोरणे जी व्यावसायिक व कौशल्य आधिारित शिक्षणावर भर देतात. आणि यामुळे आदिवासी युवकांमधील आर्थिक विकास व रोजगाराच्या संधी निर्माण होतात.

७)संशोधनाच्या अभ्यास पद्धती:

संशोधनाची रचना ही अभ्यासाच्या स्वरुपाशी मिळतीजुळती असावी लागते. आदिवासी शिक्षण धोरणांचे बहुआयामी पैलू लक्षात घेता, मिश्र पद्धतीचा दृष्टीकोन अत्यंत महत्वपूर्ण ठरतो.

संख्यात्मक तसेच गुणात्मक माहितीचे संकलन आणि विश्लेषण पद्धती यांचे एकत्रीकरण योग्य ठरते.

संख्यात्मक घटक:

- **सर्वेक्षण** : आदिवासी विद्यार्थी, शिक्षक, प्रशासकिय आधिकारी यांचा सर्वे करणे. यातुन नावनोंदणी, उपस्थिती, पायाभुत सुविधा तसेच मनुष्यबळ, शैक्षणिक कामगिरी इत्यादी विषयक माहिती मिळविणे.
- **संख्याकीय विश्लेषण:** माहितीचे विश्लेषण करण्यासाठी संख्याशास्त्रीय विश्लेषण करणारी साधने वापरणे.

- **गुणात्मक घटक:**

- **मुलाखती:** आदिवासी विद्यार्थ्यांसह, शिक्षक धोरणकर्ते, अधिकारी वर्ग, आदिवासी समुदायातील नेते यांच्या मुलाखती घेणे.

गटचर्चा: आदिवासी विद्यार्थी, पालक, शिक्षकांसोबत गटचर्चा आयोजित करणे.

- माहिती विश्लेषण: करण्यासाठी विविध तत्रांचा वापर करणे.

८) तथ्य संकलन :

- **प्राथमिक साम्रग्री :**

सर्वेक्षण: परिणामकारक माहिती संकलित करण्यासाठी प्रश्नावलीचा वापर केला जाईल.

मुलाखती किंवा गट चर्चा :

प्रश्नावली :

निरिक्षणे : एकूण परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी शाळा तसेच आदिवासी समुदायांना भेटी देणे.

- **दुय्यम सामग्री :**

सरकारी अहवाल, कागदपत्रे, शिक्षणासंबंधी माहिती गोळा करणे.

शैक्षणिक साहित्य : आदिवासी शिक्षण धोरणावर विद्यमान संशोधने, अभ्यास तसेच प्रकाशनाचा आढावा घेणे.

जणगणना २०११ व इतर माहिती

आदिवासी विकास विभागाची अहवाल

जनजातीय कार्य मंत्रालयाचे अहवाह

केंद्राचे व राज्याचे शैक्षणिक अहवाह

९)संशोधानाची चले:

शिक्षणाची संधी:

नावनोंदणी दर

गळती दर

शाळेचा वस्तीपासून अंतर

वाहतुकीची उपलब्धता

शिक्षकांची पात्रता

पायाभूत सुविधा

सुसंगत अभ्यासक्रम

सामाजिक व आर्थिक :

रोजगार

उत्पन्नाची पातळी

आरोग्य

धोरणासंबंधी :

सरकारी खर्च

समुदाय सहभाग

तंत्रज्ञानाचा वापर

९)नमुना निवड पद्धती: क्लस्टर सॅपलिंग पद्धत

संशोधनात आदिवासी भागातील विविधता व समावेशानासाठी ही पद्धत उपयुक्त ठरते.

राज्यातील विखुरलेल्या आदिवासी समाजाच्या न्याय निवडी साठी ही पद्धत उपयोगी ठरते.

संभ्याव्य नमुना आकार खालील प्रमाणे :

एकुण जिल्हे : ५

प्रत्येक जिल्ह्यातील

१ स्थानिक स्वराज्य संस्था

१ एकलव्य मॉडेल स्कूल

१ केंद्रीय आश्रम शाळा

१० राज्य आश्रम शाळा त्यात (५ प्राथिमिक ५ माध्यमिक)

५ अंगणवाडी: ICDS योजना लागू असलेली

१० वसतीगृह

१ कनिष्ठ महाविद्यालय

१वरिष्ठ महाविद्यालय

एकुण ३०

असे ३०× ५ = १५० क्लस्टर

अशा एकुण १५० क्लस्टर ची निवड करुन संशोधनासाठी माहिती एकत्रित केली जाईल.

१०)संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :

व्याप्ती:

१.धोरण विश्लेषण: केंद्र सरकारची धोरणे
२.राज्यसरकारची धोरणे
३.आदिवासी क्षेत्रासाठी विविध योजना
४.धोरणांच्या परिणामाचे मुल्यमापन
५.तुलनात्मक विश्लेषण इतर राज्याच्या धोरणांबरोबर तुलनात्मक दृष्ट्या अभ्यास करणे.
६.सरकारी अधिकारी, शिक्षक , समाजबांधव, एनजीओ, यांचा दृष्टीकोन समजून घेणे.
७.शिफारशी: विशेषणावर आधारित शिफारशी किंवा सुधारंणांची मांडणी करणे.

मर्यादा :

सामग्रीची उपलब्धता
आर्थिक अडथळे
धोरणांची गुंतागुंत

सामान्यीकरण:
संबंधीत निष्कर्ष हा महाराष्ट्र राज्यातील ५ आदिवासी जिल्ह्यापुरता मर्यादित राहिल.

११) नियोजित संशोधन प्रकरणे:

प्रकरण १ : प्रस्तावना
समस्या विधान
संशोधन विषयाशी परिचय
उद्देश

व्याप्ती मर्यादा
रचना, नमुना निवड पद्धती
संशोधन पद्धती

प्रकरण २:

भारत व महाराष्ट्रातील आदिवासी शिक्षणाचा ऐतिहासिक संदर्भ.

आदिवासी समाज

सैधांतिक चौकटी

शिक्षणातील प्रमुख मुद्दे आणि आव्हाने

पूर्वसंशोधनाचा आढावा

प्रकरण ३:महाराष्ट्रातील व भारतामधील आदिवासी संबंधी शैक्षणिक धोरणे, उपक्रम तसेच धोरण बदल.

अर्थसंकल्पीय तरतुदी

प्रकरण ४: जमिनीवर धोरणांची प्रत्यक्ष अंमलबजावणी व यशस्वी संशोधन अभ्यास व समुदाय सहभाग

प्रकरण ५: परिणामाचे विश्लेषण आणि मुल्यमापन

प्रकरण ६: शिफारसी

निष्कर्ष, सारांश आणि भविष्यासाठी सुचना

प्रकरण ७: संदर्भग्रंथ

संदर्भ सुची :

१ महाराष्ट्राचा प्रशासकीय अहवाल , आदिवासी विभाग २०१८२०१९

२ माडा क्लस्टर नोटिफिकेशन — महाराष्ट्र शासन

३ आदिवासी उपयोजना पुस्तिका २०१६—१७

४ जनगणना २०११

५ जनजातीय कार्य मंत्रालय भारत सरकार वेबसाईट

६आदिसवासी विभाग महाराष्ट्र सरकार

७ इएमआरएस गाईडलाईन्स २०२०

८ भारताचे संविधान एम लक्ष्मीकांत

९आर्थिक आणि सामाजिक विकास भाग दोन किरण देसले

१० महाराष्ट्राचा भुगोल ए.बी. सवदी

११ बेहुरा एन. के. २०१८ महाराष्ट्रातील अनुसुचित जमातीचे शिक्षण आणि सक्षमीकरण

संशोधक — मार्गदर्शक

चंद्रशेखर पंढरीनाथ जाधव — डॉ. किरण आनेनीवार

राज्यशास्त्र विभाग किनवट